PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Ashta roop jai vaibhav lakshmi mata
Year: 2001

Song: Lakshmi wrat he mahan aahe
Lyricist: Jagdish Khebudkar

लक्ष्मीव्रत हे महान आहे
ध्यास मला लागला
वैभवलक्ष्मीची लक्ष्मीची पूजा करूया चला
वैभवलक्ष्मीची लक्ष्मीची पूजा करूया चला
लक्ष्मीव्रत हे महान आहे
ध्यास मला लागला
वैभवलक्ष्मीची लक्ष्मीची पूजा करूया चला
वैभवलक्ष्मीची लक्ष्मीची पूजा करूया चला

श्री यंत्राचे पूजन करा
अष्ट लक्ष्मी रूपे स्मरा
अकरा एकवीस शुक्रवारी
नेम उपवासाचा धरा
पाट मांडून वस्त्र घाला
वर तांदळाची रास करा
एक तांब्याचा कलश ठेवा
सोन्या चांदीनं वाटी भरा
पूजेची ही करा सिद्धता
मार्ग असे हा बरा

वैभवलक्ष्मीची लक्ष्मीची पूजा करूया चला
वैभवलक्ष्मीची लक्ष्मीची पूजा करूया चला
करा अर्पण हळदी कुंकू
फुल लाल रंगाचं वाहा
गणपती शंख कंठीका
पूजा करा भक्तीने पहा
धूप दीप निरांजन वाती
आरती धरूनी रहा
नैवेद्य गोड खाद्याचा

महामंत्र मुखाने म्हणा
या रक्ताम्बुजवासिनी विलसिनी चंडांशु तेजस्विनी
या रक्ता रूधिराम्बरा हरिसखी या श्री मनोल्हादिनी
या रत्नाकर मन्थनाप्रगटिता विष्णोस्वया गेहिनी
सा मां पातु मनोरमा भगवती लक्ष्मीच्श्र पद्मावती
जय जय वैभवलक्ष्मी माता कुलदेवी मंगला
वैभवलक्ष्मीची लक्ष्मीची पूजा करूया चला
वैभवलक्ष्मीची लक्ष्मीची पूजा करूया चला

दोन्ही हातांनी प्रसाद वाटा
पाणी पूजेचं तुळशीत सोडा
पक्षीगणांना तांदूळ चारा
उपकाराशी नातं जोडा
उपवासाची सांगता अशी
फळं खाऊन पारणं फेडा
करा पूजन सुमंगलांचे
प्रेमभावानं संदेश धाडा
हात जोडूनी ध्यान करावे
लक्ष्मीच्या पाऊला
वैभवलक्ष्मीची लक्ष्मीची पूजा करूया चला
वैभवलक्ष्मीची लक्ष्मीची पूजा करूया चला
लक्ष्मीव्रत हे महान आहे
ध्यास मला लागला
वैभवलक्ष्मीची लक्ष्मीची पूजा करूया चला
वैभवलक्ष्मीची लक्ष्मीची पूजा करूया चला

PlanetRead
Literacy for a Billion

वैभवलक्ष्मीची लक्ष्मीची पूजा करूया चला
वैभवलक्ष्मीची लक्ष्मीची पूजा करूया चला

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*